# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट क्र-२११ दिनांक-३१/०५/२०२४

## वर्क फ्रॉम होम नावाखाली ऑनलाईन यु टयुब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल/मुव्ही रेटींगमध्ये गुंतवणुक करण्यास सांगुन केलेल्या फसवणुकीवरील संपुर्ण रक्कम ७,५०,०००/- रुपये तक्रारदार यांना परत करण्यात नालासोपारा पोलीस ठाण्यास यश.

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील नालासोपारा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या सौ.दिप्ती संजीव नाईक वय ३५ वर्षे, व्यवसाय ट्रॅव्हल एजन्सी, रा.आश्रय निवास, शेवटचा बस स्टॉप, गास गाव, नालासोपारा पश्चिम, ता.वसई, जिल्हा पालघर यांना वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाईन यु टयुब व्हिडीओ लाईक स्टास्क अथवा गुंतवणुक केल्यास अधिक नफा मिळण्याचे अमिष दाखवुन फिर्यादी यांची रुपये ०७,५०,०००/- ची फसवणुक झालेली होती. सदर फसवणुकीचे अनुषंगाने नालासोपारा पोलीस ठाणे येथे ५२०/२०२२ भादविस कलम ४२० सह माहीती व तंत्रज्ञान अधिनियम २००८ चे कलम ६६ (सी), ६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

नमुद तक्रारीबाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवुन तक्रारदार यांची झालेल्या व्यवहाराबाबत माहीती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहीतीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळवणेकरीता नालासोपारा पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम रुपये ७,५०,०००/- ही त्यांचे खात्यावर परत करण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ०३ विरार, श्री विजय लगारे, सहायक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री विजयसिंह बागल, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे, तत्कालीन नेमणुक नालासोपारा पोलीस ठाणे, श्री सचिन कोतमिरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री धनंजय गर्जे, पोलीस उपनिरीक्षक, पो.अं.गिरीष पाटील , दिपक जगदाळे, पो.हवा. नामदेव ढोणे , पोलीस उपआयुक्त परीमंडळ ०३ विरार कार्यालय यांनी पार पाडली.